## सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९–०००० ३६–२०१७

## नियमित दिवाणी दावा क्र.१२/२०१७

## निशाणी क्र.१६७ वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी विना उलटतपास आदेश रद्दबातल होणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१ व २ यांचे विरुध्द no cross चा आदेश झालेला आहे. सदरचा no cross चा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादी यांचे पैशाचे स्वरुपात कधीही न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणारे आहे. तरी सदर प्रतिवादीविरुध्द झालेला no cross वर आदेश रद्द करण्यात यावा व वादीची उलटतपासणी घेण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर येथे म्हणणे देऊन विरोध दर्शविला आहे.त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादी गैरहजर होता त्याचा खुलासा अर्जात कोठेही नाही. सदरचा अर्ज सदभावनेचा नाही. सबब, सदर अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

४. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रतिवादीविरुध्द दि. ०४/०९/२०२४ रोजी विना उलटतपासाचा आदेश पारित करण्यात आला. त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि.०९/१०/२०२४ रोजी दाखल केला आहे. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, अर्जातील कारण संयुक्तीक नसले तरी दाव्याचे स्वरुप बघता प्रतिवादी यांना उलटतपास घेण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक वाटते. तसेच अर्ज मंजूर केल्यास दाव्याचा निकाल गुणवत्तेवर देणे सोईचे होईल. तथापि, झालेल्या विलंबाबाबत प्रस्तुत प्रतिवादी यांच्यावर खर्च

लादणे उचित दिसते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

– **आदेश** –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांना रक्कम रु. १००/– खर्चापोटी द्यावेत. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम भरल्यानंतर विना उलटतपास आदेश रद्दबातल करण्यात येईल.

३. प्रतिवादी यांनी आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.11.08 17:34:36 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिनांकः ०६/११/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.